# राष्ट्रीय आरोग्य अभियान
## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी
## जिल्हा परिषद,गोंदिया

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने/करार तत्वावर रिक्त असलेल्या खालील पदासाठी पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | पद संख्या | जातीचा प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | मंजूर मानधन | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एल.एच.व्ही | ०५ | ५ (२ अ.ज., १ वि.जा. (अ), ,२ खुला) | ए.एन.एम. + एल.एच.व्ही. कोर्स ३.५ वर्षाचा जनरल नर्सिंग (GNM) कार्स पूर्ण असणे किंवा बी.एस.सी. नर्सिंग (उमेदवाराची महाराष्ट्र कॉन्सील कडे नोंदणी असणे आवश्यक आहे.) | १३०००/- | प्रा.आ.केंद्र स्तर |
| २ | प्रयोगशाळा तत्रंज्ञ | ०३ | ३ (१ अ.जा., १ अ. ज., १ वि.जा.) | बी.एस.सी. /डि.एम.एल.टी./बी. एम.एल.टी., अनुभव असल्यास प्राधान्य | ८०००/- | प्रा.आ.केंद्र स्तर |
| ३ | औषध निर्माण अधिकारी | ०३ | ३ (१ अ.जा.,०१ अ. ज.,०१ वि.जा.(अ.) | बी.फार्म./डी.फार्म (फार्मसी कॉन्सीकडे नोंदणी असणे आवश्यक आहे) | ८०००/- | प्रा.आ.केंद्र स्तर |
| ४ | लेखापाल | ०१ | १ (१ खुला) | बी.कॉम.,टॅली, अनुभव असल्यास प्राधान्य | ९६००/- | जिल्हास्तर |
| ५ | डाटा मॅनेजर | ०१ | १ (१ खुला) | Post Graduate Qualification in Computer Science or BE in IT Electronics | १४०००/- | जिल्हास्तर |
| ६ | सामाजिक कार्यकर्ता | ०१ | १ (१ खुला) | Sociology/Social Work या मध्ये पदव्युत्तर किंवा Sociology/Social Work मध्ये पदवी आणि २ वर्षाचा अनुभव | १२५००/- | जिल्हास्तर |
| ७ | समुपदेशक | ०१ | १ (१ खुला) | Psychology/MSW या मध्ये पदव्युत्तर किंवा Psychology समुपदेशक मध्ये पदवी आणि २ वर्षाचा अनुभव | १४५००/- | जिल्हास्तर |
| ८ | डेंटल सर्जन | ०१ | १ (१ खुला) | BDS, (महाराष्ट्र दंत कॉन्सील कडे नोंदणी असणे आवश्यक आहे.) व २ वर्षाचा अनुभव | ३००००/- | जि.श.चि. |
| ९ | डेंटल हायजीनीस्ट | ०१ | १ (१ खुला) | Dip. in Dental Hygynist शासन मान्य व २ वर्षाचा अनुभव | १५०००/- | जि.श.चि. |
| १० | डेंटल असिस्टंट | ०१ | १ (१ खुला) | 10 th उत्तीर्ण व २ वर्षाचा अनुभव | १००००/- | जि.श.चि. |
| ११ | स्त्री रोग तज्ञ | ०३ | ३ (१ अ.जा, १ अ. ज, १ खुला) | MBBS,DGO/Gyn. | ५००००/- | जि.श.चि. |
| १२ | भुलतज्ञ | ०६ | ६ (१ भ.ज.(क), १ अ.ज., १ इ.मा.व., ३ खुला) | MD (anes)/D.A. | ५००००/- | जि.श.चि. |
| १३ | रेडीओलॉजीस्ट | ०१ | १ (१ अ.जा.) | MBBS, DMRD | ५००००/- | जि.श.चि. |
| १४ | सर्जन | ०१ | १ (१ अ.जा.) | MS | ५००००/- | जि.श.चि. |
| १५ | नेफ्रोलॉजीस्ट | ०१ | १ (१ अ.जा.) | MD (nephro) | ५००००/- | जि.श.चि. |

| १६ | फिजीशीयन (MD medicine) | ०३ | ३ ( १ अ.जा, १ अ.ज, १ खुला ) | MD Medicine | ५००००/- | जि.श.चि. |
|---|---|---|---|---|---|---|

**अटी व शर्ती**

१. वरील सर्व पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून त्याचा कालावधी हा दि. ३१ मार्च २०१७ पर्यंत आहे. हा कालावधी मा. आयुक्त कु.क.तथा संचालक रा.आ.अ.मुंबई यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार व राष्ट्रीय आरोग्य अभियान पुढे सुरु राहील्यास पुर्ननियुक्ती व्दारे वाढविण्याची कार्यवाही केली जाईल.

२. वरील नमुद सर्व पदे हि राज्य शासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायम पणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही.

३. वरील सर्व पदांचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

४. जाहिरातीच्या दिवशी सदर पदांसाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष तसेच मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्ष व शासन सेवेतुन सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ६५ वर्ष राहील.

५. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

६. शासकिय सेवेतुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचे शारीरीक व मानसीक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

७. उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाचे संख्येनुसार अर्जाची छाननी करुन पात्र अर्ज जास्त प्रमाणात प्राप्त झाल्यास पदनिहाय १:५ (एकास पाच) या निकषानुसार गुणानुक्रमे पात्र उमेदवारांची यादी तयार करण्यात येवुन त्यानंतर गुणवत्तेनुसार अर्जदारांची कौशल्य चाचणी/प्रात्यक्षिक चाचणी व मुलाखती करीता पात्र उमेदवारांची यादी अर्ज केलेल्या ठिकाणी नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. याची वेगळी सुचना दिली जाणार नाही याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८. सदर प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे.

९. सदर रिक्त पदांच्या संख्येत तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो.

१०. उमेदवारास एकापेक्षा जास्त पदांकरीता अर्ज सादर करावयाचे असल्यास प्रत्येक पदांकरीता स्वतंत्र अर्ज करावा लागेल.

११. मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता व इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१२. सदर रिक्त पदांसाठी आवश्यक पात्रता असलेला अर्जदार न मिळाल्यास किंवा आवश्यक त्या संस्थेत अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरीता असलेली पात्रता (अर्हता व अनुभव) आवश्यकतेनुसार शिथील करण्यात येईल. तसेच राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेता खुल्या प्रवर्गातील प्रतिक्षा यादीतील उमेदवाराला तात्पुरती नेमणूक देण्यात येईल.

१३. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१४. उपरोक्त पदांपैकी तांत्रीक पदांकरीता तत्सम कौन्सीलकडुन प्राप्त रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.

१५. ज्या आशा स्वयंसेवीकांनी जी.एन.एम. चा कोर्स केलेला असेल त्यांना वयाची अट राहणार नाही व त्यांना भरतीप्रक्रियेत प्राधान्य देण्यात येईल. तसेच ज्या उमेदवारांना जी.एन.एम. कोर्स करीता एनएचएम कडून शैक्षणिक कर्ज घेतले असेल अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

१६. नॉन क्रिमीलिअर प्रमाणपत्र (विमुक्त जाती व भटक्या जमाती/इतर मागास वर्ग करीता आवश्यक) हे दि. ३१ मार्च २०१६ पर्यंत वैध असावे. वैद्य प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही.

१७. राष्ट्रीय आरोग्य अभियान IPHS अंतर्गत सन २०१६-१७ च्या मार्गदर्शक सुचनेनुसार तज्ञ डॉक्टारांच्या सेवा On Call Basis वर रु. ३०००/- प्रमाणे प्रति OPD (कमीत कमी ४ तास) आणि IPD (Round for Patients admitted of his specialty.) करिता इच्छुक उमेदवार आवेदन करु शकतात.

वरील पदाकरीता इच्छुक उमेदवारांनी यासोबत देण्यात आलेल्या अर्जाच्या नमुन्यात A4 आकाराच्या कागदावरील आपले अर्ज व शैक्षणिक अर्हतेसंबंधी कागदपत्रे, जन्मतारखेचा दाखला, जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र इ. झेरॉक्स प्रती साक्षांकित करुन जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,गोंदिया आमगांव रोड, पतंगा मैदान, फुलचुर, गोंदिया दि.०६/१२/२०१६पर्यंत कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळून पोस्टाव्दारे किंवा व्यक्तिशः सादर करावे. त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकृत करण्यात येणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| सदस्य | सचिव | अध्यक्ष |
| जि.ए.आ. व कु.क.सो. | जि.ए.आ. व कु.क.सो. | जि.ए.आ. व कु.क.सो. |
| तथा जिल्हा शल्य चिकित्सक, | तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, | तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, |
| सा.रु.,गोंदिया | जि.प.,गोंदिया | जि.प.,गोंदिया |

# अर्जाचा नमुना

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, गोंदिया
## आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,गोंदिया

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्र. :-

| पासपोर्ट आकाराचा अलीकडील छायाचित्र स्वत: सांक्षाकित करुन लावावे. |
|---|

प्रति,

मा. अध्यक्ष, जि.ए.आ.व कु.क. सोसायटी,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,गोंदिया

विषय :- ............................................................ या पदाकरिता अर्ज.

१) उमेदवाराचे पूर्ण नांव :- ................................................
२) उमेदवाराच्या वडिलाचे नांव :- ................................................
३) जन्म तारीख :- ................................................
:- वर्ष ......... महिना ...... दिवस .......
अक्षरी ........................................
........................................
वय :- ........ वर्ष ........ महिने ........ दिवस
(जाहिरात प्रसिध्द झाली त्या दिवशी)

४) पत्रव्यवहाराचा सूंपर्ण पत्ता :-................................................
................................................
................................................
मोबाईल क्र. ..........................................

५) अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र) आहे :- होय/नाही
६) अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे :- होय/नाही जातीचे नांव - ............
जातीचा प्रवर्ग - ..........
७) जात पडताळणी प्रमाणपत्र आहे :- होय/नाही
८) अर्जदार विवाहीत आहे किंवा नाही :- होय/नाही
९) शैक्षणिक अर्हता :-

| धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील | बोर्ड/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | अंतिम वर्षाचे गुण | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण गुण | मिळालेले गुण | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१०) इतर शैक्षणिक अर्हता :- ..............................................................................

..........................................................................................................

११) अनुभव :- (शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियान) अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी. अन्यथा अनुभवाचे गुण ग्राह्य धरले जाणार नाही.

| अ. क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१२) अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत.

१) .......................................... २) ..........................................

३) .......................................... ४) ..........................................

५) .......................................... ६) ..........................................

मी, असे प्रमाणित करतो/करते की, आपले कार्यालयाकरिता ............................ ............... या कंत्राटी पदाची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून चुकीची व खोटी आढळून आल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

ठिकाण :- .............

दिनांक :- .............

उमेदवाराची स्वाक्षरी : ........................

उमेदवाराचे पूर्ण नांव : ........................